शासन सेवेतील कर्मचा-यांची/
राजपत्रित अधिका-यांची
ज्येष्ठता यादी तयार करणे व
प्रसिध्द करणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक: एसआरव्ही १०८७/६२४/१२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ एप्रिल १९८७.

CR1987042101

शासन परिपत्रक

शासन सेवकांच्या पदोन्नती, स्थायीकरण इत्यादी प्रयोजनासाठी अन्य बाबी समवेत त्यांची सेवेतील/संवर्गातील ज्येष्ठता विचारात घ्यावयाची असते. त्यासाठी भिन्न सेवेत/संवर्गात असणा-या सर्व सेवकांची अद्यावत ज्येष्ठता यादी बनविणे आणि संबंधितांच्या माहितीसाठी ती प्रसिध्द करणे आवश्यक असते. तथापि, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, शासन सेवेतील राजपत्रित अधिका-यांच्या/कर्मचा-यांच्या ज्येष्ठता याद्या नियमितपणे तयार करुन प्रसिध्द केल्या जात नाहीत किंवा त्या प्रतिवर्षी अद्यावत केल्या जात नाहीत. परिणामी त्या त्या सेवेत/संवर्गात काम करीत असणा-या राजपत्रित अधिका-यांना/कर्मचा-यांना त्या सेवेत/संवर्गात आपले स्थान निश्चित कोठे आहे याबद्दलची जाणीव होत नाही. अतएव, शासनाचे असे आदेश आहेत की, शासन सेवेतील राजपत्रित अधिकारी/कर्मचारी ज्या सेवेत/संवर्गात काम करीत आहेत त्यांची सेवा/संवर्ग निहाय ज्येष्ठता यादी प्रतिवर्षी १ जानेवारी हा आधारभूत दिनांक मानून एप्रिल महिन्यामध्ये तयार करण्यात यावी आणि ती संबंधित राजपत्रित अधिकारी/कर्मचारी यांच्या माहितीसाठी तात्काळ प्रसिध्द करण्यात यावी. या यादीमध्ये विभागाचे नांव, संवर्गाचे नांव, शासन सेवकांची ज्येष्ठतेनुसार नावे, राखीव जाती/जमातीचा असल्यास तसा उल्लेख आणि प्रत्येकाच्या त्या संवर्गातील नियुक्तीचा दिनांक या माहितीचा समावेश असावा.

२. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, शासनाचे सदर आदेश आपल्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास कृपया आणावेत आणि त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाईल याबाबत दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्र. बा. देसाई,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति

राज्यपालांचे सचिव,

[कु. मा. प.]

शामसु-रोटा-साप्रवि-एक-१६१[५,०००-५-८७]

मुख्य मंत्र्यांचे सचिव,
× प्रबंधक, उच्च न्यायालय [मूळ बाजू], मुंबई,
× निबंधक, उच्च न्यायालय [अपील शाखा], मुंबई,
× निबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय,
× सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग [१० प्रती].

---

× पत्राने.

एच-१६१[५,०००-५-८७]-अ